**ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांसाठी जमीन /जागा उपलब्ध करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः ग्रापाधो-२०२२/प्र.क्र.५७ /पापु-०७**

सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, क्रॉफर्ड मार्केट जवळ, नवीन मंत्रालय इमारत, मुंबई ४०० ००१
तारीख: ०६ जानेवारी, २०२३

वाचा -

१) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक: जजीमि २०१९/प्र.क्र.१३८/पापु-१०(०७), दि. १५/०२/२०२१
२) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक: जजीमि २०१९/प्र.क्र.१३८(भाग-२)/पापु-१०(०७), दि. १०/०३/२०२१
३) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पत्र क्र. जा.क्र. मजीप्रा/ सस/ताशां-३/ ४९४/२०२२, दि. २२/०४/२०२२.
४) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पत्र क्र. जा.क्र. मजीप्रा/ सस/ताशां-४/ ६७५/२०२२, दि. २६/०५/२०२२.

प्रस्तावना -

राज्यातील ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी केंद्र शासनाच्या तसेच राज्य शासनाच्या मागणी आधारीत धोरणांतर्गत विविध योजना तसेच बाह्य अर्थसहाय्यीत जलस्वराज्य प्रकल्प, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम, मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम यासारख्या उपाययोजना पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत राबविल्या जात होत्या. पाणी पुरवठ्याचे स्त्रोत बळकट करण्यासाठी शिवकालीन पाणी साठवण योजना तसेच महाराष्ट्र भूजल अधिनियमांतर्गत उपाययोजना केल्या जात आहेत. ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने मागणी आधारित लोकसहभागाचे धोरण स्वीकारले आहे. या धोरणानुसार ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांची मागणी, आखणी, अंमलबजावणी आणि देखभाल दुरुस्ती संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थांनी करावयाची आहे. ही कार्यवाही जिल्हा परिषदा व ग्रामपंचायतीच्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या माध्यमातून करण्यात येते. काही प्रादेशिक पाणी पुरवठा योजना ह्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत देखील राबविण्यात येत आहेत. या धोरणाची अंमलबजावणी करीत असताना सदर अंमलबजावणी कालबध्द पध्दतीने पूर्ण करण्याची प्रक्रिया अधिक बळकट करणे आणि ग्रामीण जनतेस शाश्वत व पुरेसा पाणी पुरवठा उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आले आहे.

केंद्र शासनाच्या सुधारीत मार्गदर्शक सुचनांनुसार राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाचे रुपांतरण जल जीवन मिशन मध्ये करण्यात आले असून, राज्यात दिनांक ०४/०९/२०२० पासून जल जीवन मिशन कार्यक्रम केंद्र शासनाच्या सूचनांप्रमाणे राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत “हर घर नल से जल” हे उद्दिष्ट पूर्ण करावयाचे असून, या मिशन मध्ये “कार्यात्मक घरगुती नळ जोडणी” (Functional Household Tap Connections-FHTCs) वर भर देण्यात आला आहे. प्रत्येक घरात ५५ लिटर प्रतिदिन प्रतिमाणशी कार्यात्मक घरगुती नळ जोडणीचे उद्दिष्ट पूर्ण करण्याकरिता शाश्वत पाणी पुरवठा असणे आवश्यक आहे.

“ जल जीवन मिशन ” हा कार्यक्रम केंद्र शासनाचा महत्वाकांक्षी कार्यक्रम असून सन २०२४ पर्यंत सदर कार्यक्रम पुर्ण करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. सदर कार्यक्रम हा राज्यातील ग्रामीण भागात राबविण्यात येत आहे. पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी करताना प्रकल्पाच्या आवश्यकतेनुसार लागणारी जमीन उपलब्ध होत नसल्यामुळे अनेकवेळा प्रकल्पांची अंमलबजावणी करणे अडचणीचे ठरते.

जल जीवन मिशन कार्यक्रमात भूसंपादनाची तरतूद नसल्याने या संदर्भात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने जल जीवन मिशन अभियानांतर्गत पाणी पुरवठा योजनाच्या विविध उपांगासाठी लागणाऱ्या शासकीय जमिनी विनामोबदला उपलब्ध करण्याबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र. ३ व ४ अन्वये शासनास सादर केला होता. सदर प्रस्तावानुसार ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांच्या उपांगासाठी विविध विभागांच्या अधिपत्याखालील जमिनीची आवश्यकता लागणार असून सदर जमिनी ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांकरिता विनामोबदला उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव दि. २९/१२/२०२२ रोजीच्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास मंत्रीमंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार या संदर्भातील शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय -**

" जल जीवन मिशन " हा महत्वाकांक्षी व कालबध्द कार्यक्रम असल्याने ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या उपांगाकरिता पाणी पुरवठा योजनेची अंमलबजावणी करणा-या यंत्रणेने अन्य शासकीय विभाग / स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या अधिपत्याखालील जमिनीची मागणी केल्यास संबंधित विभाग / स्थानिक स्वराज्य संस्थानी सदर जागेसाठी मालकी हक्क हस्तांतरित न करता ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या उपांगाच्या वापराकरिता ना-हरकत दाखला (No Objection Certificate) सत्वर उपलब्ध करुन द्यावा.

नगर विकास विभागामार्फत सुध्दा पाणी पुरवठा व मलनि:स्सारण योजना राबविण्यात येत असल्याने सदर शासन निर्णय नगर विकास विभागाच्या अमृत व नगरोत्थान या योजनांसाठी सुध्दा लागू राहील.

वन (संवर्धन) अधिनियम ,१९८० नुसार वनजमीन वळती करताना पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन सारख्या बाबींसाठी त्यात काही सुट देण्याबाबतची तरतूद असल्याने वन विभागाशी संबंधित जमिनीची मागणी असल्यास त्याबाबत वन (संवर्धन) अधिनियम,१९८०; भारतीय वन अधिनियम, १९२७ व वन्यजीव संरक्षण अधिनियम,१९७२ च्या अधिनियमातील तरतूदींच्या आधारे व प्रकरणपरत्वे वन विभागाने सत्वर निर्णय घ्यावा व ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या उपांगांच्या वापरासाठी लागणाऱ्या जमिनीसाठी ना- हरकत दाखला उपलब्ध करुन दयावा. वित्त विभागाने अनौपचारिक संदर्भ क्र. १२७, दि.०५/०१/२०२३ अन्वये सदर शासन निर्णयास मान्यता दिली आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३०१०६१३१९२९३७२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SANJAY D MANE

Digitally signed by SANJAY D MANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SCHOOL EDUCATION AND SPORTS DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7322cf22539d1c2a9ec41d18debd6a1b1822daa203eedff083386e6f6686c0f5, pseudonym=2152EF092ACE449908EC8295FCF5D4CE29D8973B, serialNumber=CC816238ED3C914E2FA2E99DA4BC0BA4E1F6947AA23AD145E3DC6A469041090F, cn=SANJAY D MANE
Date: 2023.01.06 13:37:42 +05'30'

(संजय माने)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.

२. मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. विधानसभा/ विधानपरिषद सदस्य.
६. अपर मुख्य सचिव, महसूल व वन /उद्योग / जलसंपदा/ग्राम विकास /नियोजन/ वित्त विभाग
७. प्रधान सचिव ,(वने) महसूल व वन विभाग/नगर विकास विभाग/ सार्वजनिक बांधकाम विभाग/ मंत्रालय, मुंबई.
८. सर्व विभागीय आयुक्त.
९. सर्व जिल्हाधिकारी.
१०. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद
११. सर्व महानगरपालिका आयुक्त.
१२. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, चौथा मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरिमन पॉईंट, मुंबई.
१३. आयुक्त, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, भूजल भवन, शिवाजीनगर, पुणे.
१४. मिशन संचालक, जल जीवन मिशन, राज्य पाणी व स्वच्छता मिशन, पहिला मजला (दक्षिण कक्ष), सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई.
१५. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व).
१६. प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा (सर्व).
१७. सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालये.
१८. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पयवेक्षीय अधिकारी व कार्यासने.
१९. निवडनस्ती, कार्यासन पापु-०७, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.